योजनेचे नावः राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

अ.क्र.	शिष्यवृत्ती योजना	तपशील
१.	शिष्यवृत्ती योजनेचे उद्दिष्ट	पदवी, पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.
२.	शिष्यवृत्ती योजनेचे स्वरुप	शिक्षण शूल्क ५० टक्के व परीक्षा शूल्क ५० टक्के विद्यार्थ्यांनीना शिक्षण शूल्क व परीक्षा शूल्क १०० टक्के
३.	लाभार्थ्यांच्या पात्रतेच्या अटी/शर्ती/निकष	• अर्जदार भारताचा नागरिक असणे आवश्यक आहे. • अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे. • शासन निर्णयामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे अर्जदार हा व्यावसायिक आणि तांत्रिक अभ्यासक्रमासाठी (पदवी/पदव्युत्तर) प्रवेश घेतलेला संस्थेचा (प्रमाणित) बोनाफाईड विद्यार्थी असावा. • मान्यता अप्राप्त विद्यापीठ आणि खाजगी विद्यापीठ प्रवेशपात्र नाहीत. • अर्जदार केंद्रिय प्रवेश प्रक्रिया माध्यमातून दाखल होणे गरजेचे आहे. • अर्जदाराने कोणत्याही इतर शिष्यवृत्तीचा लाभ घेऊ नये. • चालू शैक्षणिक वर्षासाठी, कुटुंबाच्या फक्त दोन मुलांना या योजनेच्या लाभासाठी परवानगी आहे. • कौटुंबिक/पालकांचे एकूण वार्षिक उत्पन्न आठ लाखांपेक्षा जास्त नसावे. • मागील सत्रामध्ये किमान ५० टक्के उपस्थिती आवश्यक आहे. (महाविद्यालयात नव्याने भरती झाल्यास अपवाद) • अभ्यासक्रम कालावधी दरम्यान, अर्जदाराचे दोन वर्षांपेक्षा जास्त अंतर नसावे.